# महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ महिला सुरक्षा रक्षक [कंत्राटी] प्रतीक्षाधीन यादी - २०१८
# ऑनलाईन अर्जासाठी महत्वाच्या सूचना.

**(सदरची प्रतीक्षाधीन यादी मुंबई शहरात कर्तव्य करण्यासाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांसाठी)**

महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाचे आस्थापनेवरील महिला सुरक्षा रक्षक [कंत्राटी] प्रतीक्षाधीन यादी - २०१८ साठी अर्ज भरायला सुरूवात करण्यापूर्वी व नंतरचा संभाव्य गोंधळ टाळण्यासाठी सर्व माहिति व आवश्यक कागदपत्रे/प्रमाणपत्रे हाताशी तयार असल्याची खातरजमा करून घ्या. अधिक मार्गदर्शनासाठी खालील तपास सूची पहा.

1. तपास सूची :

| | | |
|---|---|---|
| भ्रमणध्वणी क्र. | नियमीत सूचना प्राप्त करण्यासाठी वैध भ्रमणध्वणी क्रमांकाची अर्जावर नोंद करणे अनिवार्य आहे. आपल्या भ्रमणध्वणी क्रमांकावर एसएमएस द्वारे नियमित सूचना पाठविल्या जातील | ✓ |
| आधार क्र. व पॅन कार्ड क्र. | उमेदवारांनी अर्ज भरताना स्वतःचे आधार कार्ड क्रमांक व पॅन कार्ड क्रमांक अचूक नमुद करणे अनिवार्य आहे. | ✓ |
| छायाचित्र | प्रतीक्षाधीन यादीकरीता अर्ज भरताना स्वतःचे छायाचित्र तसेच स्वतःची सही स्कॅन करून अपलोड करणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज करताना उमेदवाराने स्वतःचा अद्यावत [Latest] कोणत्याही प्रकारची टोपी न घातलेला फोटो जेपीईजी / पीएनजी / टीआयएफएफ स्वरूपातच [२००KB पिक्सेल इतकी असावी.] अशा विहीत पध्दतीने अपलोड करणे अनिवार्य आहे. **[टीप : अर्जावर दुसऱ्याचा फोटो असल्यास सदर उमेदवारास प्रतीक्षाधीन यादीप्रक्रियेच्या ठिकाणी प्रवेश दिला जाणार नाही]** | ✓ |
| दस्तऐवज | इयत्ता बारावी उत्तीर्ण गुणपत्रिका, अधिवास प्रमाणपत्र [महाराष्ट्राचा रहिवासी असल्याचे] इत्यादी प्रमाणपत्रे आवश्यक आहेत. | ✓ |
| प्रवेश शुल्क | **Rs. २००/- ( Non Refundable) (Online पद्धतीने भरणा करावेत)** | ✓ |

- वयोमर्यादा निश्चितीकरिता दिनांक (Cut Off Date) :- १८ ते २८ वर्षे [२८/०२/१९९० ते २८/०२/२००० दरम्यान जन्मलेले उमेदवारच पात्र]
- **शैक्षणिक पात्रता :-** बारावी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. [First Attempt [Weightage] [सविस्तर माहितीसाठी जाहिरात पहावी]

(१) १२ वी परीक्षेत ७०% पेक्षा अधिक गुण - ५० गुण

(२) १२ वी परीक्षेत ६०% ते ७०% गुण - ४० गुण

(३) १२ वी परीक्षेत ५०% ते ६०% गुण - ३० गुण

(४) १२ वी परीक्षेत ४०% ते ५०% गुण - १० गुण

(५) १२ वी परीक्षेत ४०% पेक्षा कमी गुण - ०० गुण

- **शारीरिक पात्रता :-**

  (१) उंची – १६० से.मी. पेक्षा कमी नसावी.

  (२) वजन – ४५ कि. ग्रॅ. पेक्षा कमी नसावे

- **अर्ज करण्याची पध्दत :-**

➢ आवेदन अर्ज [Application Form] :- प्रतीक्षाधीन यादीसाठी आवेदन अर्ज महामंडळाचे **http://www.mahasecurity.gov.in/applicationform.php** या संकेतस्थळाद्वारे ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार आहेत. संपर्क तपशीलामध्ये संपूर्ण पत्ता अचूक भरावा. शैक्षणिक तपशीला मध्ये गुणपत्रिकेची सविस्तर माहिती भरा.

➢ सुरक्षा रक्षक प्रतीक्षाधीन यादीच्या अटी व शर्ती महामंडळाचे **www.mahasecurity.gov.in** या संकेतस्थळावर **advertisement** या **tab** मध्ये पहाव्यात.

(१) अर्ज अचूक भरल्यानंतर उमेदवारांनी अटी व शर्ती वाचून **[Submit] Tab** वर **Click** करावे. [उमेदवारांनी अर्ज **[Submit]** करण्यापूर्वी **Application Form** वरील " Preview Your Application " या Tab वर Click करून फॉर्म अचूक असल्याची खात्री करावी.]

(२) अर्ज ऑनलाईन **[Submit]** केल्यानंतर उमेदवारास **Application ID** [उदा. **MSSC-MAR-01**] अशा प्रकारे प्राप्त होईल.

(३) त्यानंतर **Online Payment** साठी स्क्रिनवर **Continue to Payment** वर **Click** करावे.

(४) त्यानंतर अर्जदाराने क्रेडिट / डेबीट कार्डद्वारा / इंटरनेट बँकिंगद्वारे परिक्षा शुल्क भरताक्षणी आवेदन कर्त्यास रक्कम प्राप्त झाल्याचा संदेश प्राप्त होईल आणि त्यांचे ऑनलाईन ट्रान्झेक्शन पुर्ण होईल. [ऑनलाईन पेमेंट झाल्याशिवाय अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण होणार नाही व तुमचा फॉर्म रद्द होईल]

(५) ऑनलाईन ट्रान्झेक्शन पुर्ण झाल्यानंतर स्वतःच्या माहितीसाठी **Payment Receipt** व **Application Form** ची प्रिंट घ्यावी. व सदरची प्रिंट प्रतीक्षाधीन यादी प्रक्रिये दरम्यान घेऊन यावी.

(६) ऑनलाईन ट्रान्झेक्शन फेल झाल्यास **"We are sorry but the transection failed"** असा संदेश संगणकावर प्राप्त होईल. त्यावेळेस **"Try again"** या Tab वर **Click** करावे व पुन्हा **Payment** करावे.

(७) काही कारणास्तव इंटरनेट कनेक्शन गेल्यास, फॉर्म पुन्हा **[Submit]** करण्यासाठी महामंडळाचे **http://www.mahasecurity.gov.in/applicationform.php** या संकेतस्थळावर जाऊन "Click Your Application ID" या Tab खालील Existing Application ID मध्ये आपल्याला प्राप्त झालेला Application ID नंबर टाकावा व नंतर "Click Your Application ID" या Tab वर Click करावे. त्यानंतर तुम्ही परत "Continue to Payment" वर Click करावे.

2. **मैदाणी चाचणी प्रक्रिया :-** ऑनलाईन आवेदन अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर उमेदवारांना मैदानी चाचणी करीता त्यांनी अर्जात नमूद केलेल्या मोबाईल क्रमांकावर संदेश पाठविण्यात येईल. या संदशामध्ये मैदानी चाचणी करीता हजर राहण्याची तारीख, वेळ व ठिकाण इत्यादी गोष्टीचा समावेश असेल. उमेदवारांनी मैदानी चाचणी करीता येताना ऑनलाईन अर्ज भरल्या बाबतची प्रिंट आऊट घेऊन यावी. सदर अर्जाची प्रिंट आऊट **www.mahasecurity.gov.in** वेबसाईटवर **advertisement** या **tab** मधुन डाऊनलोड करून घेऊ शकतात.

- **मैदानी चाचणी गुण प्रक्रिया :-**

(१) २ मि. ५० सेकंद किंवा त्यापेक्षा कमी - ५० गुण.
(२) २ मि. ५० सेकंदापेक्षा जास्त परंतु ३ मि. ०० सेकंद किंवा त्यापेक्षा कमी - ३५ गुण.
(३) ३ मि. ०० सेकंदापेक्षा जास्त परंतु ३ मि. १० सेकंद किंवा त्यापेक्षा कमी - १५ गुण.
(४) ३ मि. १० सेकंदापेक्षा जास्त परंतु ३ मि. २० सेकंद किंवा त्यापेक्षा कमी - ०५ गुण.
(५) ३ मि. २० सेकंदापेक्षा जास्त – **अपात्र - ०० गुण**

3. **प्रमाणपत्रांची निश्चिती दिनांक [Cut off Date] :-** अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिनांकापर्यंत म्हणजेच १५/०३/२०१८ रोजीपर्यंत सर्व शैक्षणिक प्रमाणपत्रे व अर्हता प्राप्त करून घेणे उमेदवारांवर बंधनकारक राहिल. अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिनांका नंतर प्राप्त करून घेण्यात आलेले प्रमाणपत्र ग्राहय धरण्यात येणार नाही.

4. **प्रतीक्षाधीन यादी :-** उमेदवारांची मैदानी चाचणी व बारावी परिक्षेतील प्राप्त गुण एकत्रित करून प्रतीक्षाधीन यादी तयार करण्यात येईल. सदरबाबतची प्रतीक्षाधीन यादी **www.mahasecurity.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

५.१ मैदानी चाचणी व शैक्षणिक गुणानुसार तात्पुरती प्रतीक्षाधीन यादी तयार करण्यात येईल.
५.२. प्रतीक्षाधीन यादीतील उमेदवारांची नियुक्ती कंत्राटी स्वरुपाची असेल.
५.३. गुणवत्ता यादीत उमेदवारांच्या नावाचा समावेश झाला म्हणून नियुक्तीचा हक्क प्राप्त होणार नाही.
५.४. जाहिरातीतील नमूद पदांची संख्या महामंडळाच्या आदेशाच्या अधीन असेल.
५.५. प्रतीक्षाधिन यादीबाबत कोणताही दावा करण्याचा हक्क उमेदवारास राहणार नाही.
५.६. प्रतीक्षाधीन यादीतील उमेदवारांना महामंडळाच्या आवश्यकतेनुसार पाचारण करण्यात येईल.

5. **मदतीसाठी :-**

उमेदवारांना काही अडचणी भासल्यास ८४३३९०२९७२ / ०२२-२२१५१६७० / ०२२-२२१५१८२४ या हेल्पलाईन नंबरवर, सकाळी ०८.०० ते रात्रौ ०८.०० या वेळेत संपर्क साधावा.

- **महत्वाची सूचना :-**

(१) महिला सुरक्षा रक्षक प्रतीक्षाधीन यादी – २०१८ च्या अनुषंगाने मैदानी चाचणीसाठी उमेदवारांना त्यांनी Online फॉर्म भरताना स्वतःचा जो भ्रमणध्वनी क्रमांक दिलेला आहे. त्यावर संदेश पाठविण्यात येतील.
(२) उमेदवारांनी महामंडळाचे **www.mahasecurity.gov.in** या संकेतस्थळावर Employee Corner मध्ये महत्वाच्या सूचनांसाठी वेळोवेळी पाहावे.